महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

दुरध्वनी क्रमांक - 0257- 2220152

ई मेल - homebranchjalgaon@gmail.com

---

वाचले :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/59/2, दिनांक 24 मार्च, 2020

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 15 एप्रिल, 2020

6. भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील आदेश क्रमांक 40-3/2020/डीएम-आय (ए) दिनांक 15 एप्रिल, 2020

7. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/59/2, दिनांक 14 एप्रिल, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/136

दिनांक 15 एप्रिल, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्‌घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्‌घातात नमूद या कार्यालयाचे आदेश दिनांक 24 मार्च, 2020 अन्वये जळगांव शहर महानगरपालिका जळगांव तसेच जळगांव जिल्हयातील सर्व नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रातील व या शहरांच्या 03 किलो मीटर परिसरातील सर्व पेट्रोल/डिझेल पंप केवळ सकाळी 07.00 ते सकाळी 10.00 व दुपारी 04.00 ते सायं. 07.00 वाजे पर्यंतच सुरु राहण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्‌घातात नमूद महाराष्ट्र शासनाकडील अधिसूचना व भारत सरकार यांचेकडील आदेशानुसार सर्व प्रकारची माल वाहतूक सुरु ठेवण्याबाबत निर्देश दिलेले असून अशी माल वाहतूक करणा-या वाहनांना पेट्रोल / डिझेल यांची निर्धारीत वेळे व्यतिरीक्त आवश्यकता भासू शकते. तसेच पेट्रोल /डिझेल पंप ओनर्स असोसिएशन जळगांव यांनी समक्ष भेटून माल वाहतूक करणा-या वाहनांना राष्ट्रीय महामार्गावरील पेट्रोल / डिझेल पंपावर पेट्रोल/डिझेल भरणा करण्यास वेळ निर्धारीत केलेली असल्याने इंधन उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत असून त्यामुळे सदरील वाहनांच्या पुढील प्रवासात अडचण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आणून दिलेले आहे. सबब माल वाहतूक करणा-या व अन्य वाहनांची राष्ट्रीय महामार्गावर होणारी इंधन भरण्याची गैरसोय दुर करणे क्रम प्राप्त असे माझे मत आहे.

त्याअर्थी, मी, डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **"जळगांव शहर महानगरपालिका जळगांव तसेच जळगांव जिल्हयातील सर्व नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रातील व या शहरांच्या 03 किलो मीटर परिसरात असलेल्या पेट्रोल/डिझेल पंप वगळून 1) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 753-जे मौजे जळगांव-पाचोरा-भडगांव-चाळीसगांव-नांदगांव, 2) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 06 मौजे धुळे - जळगांव-**

Scanned with CamScanner

चिखली, 3) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 753-एफ मौजे जळगांव-पहूर-सिल्लोड- औरंगाबाद, 4) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 753-एल मौजे पहूर-जामनेर-बोदवड-मुक्ताईनगर-ब-हाणपूर या राष्ट्रीय महामार्गावर असलेले पेट्रोल / डिझेल पंप यांना सर्व प्रकारची माल वाहतूक करणा-या वाहनांना इंधन विक्री करण्यासाठी कोणतेही वेळेचे बंधन असणार नाही, असे आदेश पारीत करीत आहे."

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 15/04/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

(डॉ. अविनाश ढाकणे)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
7. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
9. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
10. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, जळगांव
11. एरीया मॅनेजर, IOCL, BPCL, HPCL, NYRA, RELIANCE जळगांव
12. सेल्स ऑफिसर IOCL, BPCL, HPCL, NYRA, RELIANCE जळगांव
13. पेट्रोल/डिझेल डिलर्स असोसिएशन, जळगांव

**प्रत :- म. संचालक, येरवडा कारागृह, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, पुणे** यांनी सदरील आदेशाचे शासकीय राजपत्रात प्रसिध्दी देऊन त्याची दोन प्रती या कार्यालयास पुरविण्यात याव्यात.

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner